| | |
|---|---|
| नि.फौ.ख.क्र. ४२७६/२०२५ | |
| सरकार -वि- तौसीफ खान | |
| निशाणी क्र. ०८ | |

## सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र.३ यांची शपथेवर सरतपासणी

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

| | | |
|---|---|---|
| **नांव** | : | मनिष गणपत यादव, |
| **वय** | : | ३५ वर्षे, |
| **धंदा** | : | व्यवसाय, |
| **राहणार** | : | सैलाबनगर, कामठी, जिल्हा नागपूर |

## सरकार पक्षातर्फे विद्वान सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती अंजु चिंचोळकर यांचेमार्फत-

दिनांक २३.०७.२०२५ रोजी पोलीस माझ्या घराजवळ आले होते. तेव्हा मी माझ्या घराच्या अंगणात बकरी बांधत होतो. घरासमोरील रस्त्यावर आरोपी तौसीफ खान धावत आला व पोलीसांनी त्याला पकडले. त्याबाबत पोलीसांनी माझी एका लिहिलेल्या कागदावर सही घेतली. त्यातील मजकूर मला वाचून दाखविला नाही. पोलीसांनी माझ्याकडून काही जप्त केले नाही. असे काही झाले नाही की, आरोपी जेव्हा माझ्या घराजवळ आला तेव्हा त्याने मला ₹३०००/- दिले होते व पोलीसांनी ते माझ्याकडुन जप्त केले.

## सरकारी अभियोक्तांच्या विनंतीवरुन साक्षीदार अभियोगपक्षास सहाय्य करीत नसल्याने उलट तपासणी घेण्याची परवानगी देण्यात आली. उलटतपास सरकारी अभियोक्तांतर्फे

२. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी जेव्हा माझ्या घराजवळ आला तेव्हा त्याने मला ₹३०००/- दिले होते व पोलीसांनी ते माझ्याकडुन जप्त केले. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी त्याबाबत जप्तीपंचनामा केला व त्यातील मजकूर मला वाचून दाखविला. हे म्हणणे खरे नाही की, सदर जप्तीपंचनाम्यावर माझ्याकडून पोलीसांनी ₹३०००/- जप्त केल्याचे दाखवून सदर पंचनाम्यावर माझी सही घेतली. मला आता जप्तीपंचनामा दिनांक २३.०७.२०२५ दाखविण्यात

आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर मला माहीत नाही. त्यास सहीपुरता **निशाणी पी-५** देण्यात येतो. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझा जवाब नोंदविला. मला आता माझ्या जवाबातील अधोरेखांकीत भाग ए दाखविण्यात आला. त्यातील मजकूर मी पोलीसांना सांगितला नव्हता. पोलीसांनी सदर मजकूर माझ्या जवाबात का नमुद केला याचे कारण मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला वाचविण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

**आरोपी व आरोपीतर्फे अधिवक्ता गैरहजर म्हणून फौ.प्र.सं. चे कलम ३०९(क) प्रमाणे पुरावा उलटतपासणीच्या वाचुन पुढे**

**उलटतपास पुर्ण**
**फेरतपास – नाही**

श्रवणोत्तर स्वीकृत

माझे समक्ष

ANAMIKA DEBASHISH BOSE

Digitally signed by ANAMIKA DEBASHISH BOSE
Date: 2026.03.11 11:35:34 +0530

( **अनामिका दे. बोस** )
अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,
नागपूर.

दिनांक १०.०३.२०२६